## प्रकरण पाचवे

## ।। उपसंहार ।।

## प्रकरण पाचवे

## ।। उपसंहार ।।

मराठी साहित्यातील "ललित गद्य" या वाङ्·मयप्रकारात आपल्या आगळ्या वैशिष्टयांनी मोलाची भर टाकणारे अनिल अवचट हे एक लेखक आहेत· "अनिल अवचट यांच्या ललित गद्य लेखनाची वैशिष्टये" "माणसं" व "धागे आडवे उभे" या संग्रहाच्या आधारे अभ्यासत असताना पहिल्या प्रकरणात आपण ललित गद्याची पार्श्वभूमी व स्वरूप विवेचन पाहिले·

"ललित गद्य" हा ललित वाङ्·मयातील कथा, कादंबरी, नाटक या वाङ्·मयप्रकारासारखाच एक वैशिष्टयपूर्ण असा वाङ्·मयप्रकार आहे· "ललित गद्या"चे स्वरूप सर्वसमावेशक आहे·

इंग्रजी निबंध हा मराठी निबंधापेक्षा तीनशे वर्षांनी अगोदरचा आहे· मॉन्तेन, काऊले, डीफो, त्याबरोबर बेकन, स्टील, अॅडिसन, चार्लस लॅम्ब, ल्यूकास, लिंड, गार्डिनर यांच्या योगदानाने फुललेला "लघुनिबंध" इंग्रजी भाषा वाङ्·मयाच्या अभ्यासानेच मराठी भाषेला ओळखीचा झाला·

इंग्रजीतील हा "पर्सनल एसे" फडक्यांनी ४१९२६ ते १९३१ ४ "गुजगोष्टी" ४निबंधात्मक४, तर १९२७ ला खांडेकरांनी "लघुलेख" या नावाने "लघुनिबंध" मराठीत आणला· या "ललित गद्या"विषयी विविध विचारवंतांनी मांडलेली मते आपण पाहिली, स्वरूप विवेचनात असे दिसून आले की, रचनेच्या अनुकरणात व लोकप्रियतेच्या स्वरूपामुळे लघुनिबंध हा "कृतक लघुनिबंध" होऊ लागला होता· त्याला बेगडी स्वरूप आले· पण याच काळात फडके, खांडेकर, काणेकर, ना·मा·संत, कुसुमावती देशपांडे, वि·ल·बर्वे, गो·रा·दोडके, इत्यादींनी मराठी लघुनिबंधाला बेगडी स्वरूपापासून सावरण्याचा प्रयत्न केला· फडक्यांनी हा प्रकार मराठीत रूजविला, खांडेकर, काणेकरांनी १९५०पर्यंत फुलविला·

लघुनिबंध "ललित गद्य" झाल्याची स्पष्ट प्रचिती १९५० च्या जवळपास प्रसिध्द झालेल्या "परिपूर्ती" (इरावती कर्वे, १९४९), "ॠतुचक्र" (दुर्गा भागवत, १९५६ ) "स्पर्शाची पालवी" (गो.वि.करंदीकर, १९५८) या संग्रहातून आपल्याला मिळते.

पन्नास नंतरचा हा "ललित गद्य" आत्मनिष्ठ "मी"त्वाच्या शोधात, आविष्कारात गुंतला, अनुभवाच्या भावस्थितीनुसार त्याची भाषा व मांडणी आकार घेऊ लागली. नटवी आत्मप्रदर्शनात्मकता जाऊन मनःपूर्वक "मी"त्वाचे दर्शन झाले. मुद्दाम पवित्रा घेऊन सांगणाऱ्या ठोस विचारांचे स्वरूप जाऊन तो अंतर्यामी गंभीर बनला.

"ललित गद्या"तील लघुनिबंध, ललित निबंध, प्रवास लेख, या प्रकारात "मी"त्वाचा आविष्कार दिसतो, तर ललित लेख, व्यक्तिचित्रे या प्रकारात "विषयवस्तू" "मी"त्वाच्या आविष्कात तुलनेने प्रभावी ठरते. "ललित गद्य" हा साहित्य प्रकार सर्जन प्रक्रियेतच द्विकेंद्रीय अवस्थेत असतो. "ललित गद्य" हा वाङ्मयप्रकार आपल्या सीमारेषा विविध स्वरूपात उल्लंघत असताना दिसतो, हे चैतन्याचे लक्षण आहे. त्यामुळेच "ललित गद्या"ची "लघुनिबंध", "ललित निबंध", "ललित लेख" अशी चैतन्यमय विकासाची वाढ आपल्याला स्पष्ट जाणवते.

ललित गद्याच्या स्वरूप विवेचनाबरोबर "मराठी ललित गद्या"चा १) ऐतिहासिक मागोवा, २) १८१८ ते १८७४चा कालखंड, ३) १८७४ १९२० चा कालखंड, ४) १९२० ते १९४५ कालखंड, ५) स्वातंत्र्योत्तर काळातील ललित गद्य, अशा रीतीने "ललित गद्य" लेखनाच्या कक्षा निबंधापासून कालक्रम, लेखक नि त्यांची वैशिष्टये यासह कशा विस्तारत गेल्या याचा आपण स्थूल स्वरूपात आढावा घेतला.

दुसऱ्या प्रकरणात आपण अनिल अवचट या "ललित गद्य" लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय करताना जन्म, बालपण, शिक्षण, विवाह, कुटुंबीय, स्वभाव,छंद,कार्यकर्ता म्हणून भूमिका, मुक्तांगणमधील काम, पत्रकारिता, विविध पुरस्कार, ग्रंथसंपदा आणि जीवनविषयक दृष्टिकोण या घटकांचा विचार केला आहे.

तिसऱ्या प्रकरणात अनिल अवचट यांच्या "माणसं" मधील आशय व अभिव्यक्तीच वैशिष्टये आपण पाहिली. "माणसं"मधील अनिल अवचट यांचे लेखन हे दुष्काळग्रस्त, हमाल, झोपडपट्टीवासीय भटके आणि निपाणीमधील विडी कामगार स्त्री अशा उपेक्षित, शोषित, समाजपरिघापासून दूर फेकलेल्या दुर्लक्षित माणसांच्या जीवनाचे वेध घेणारे आहे. या माणसांना जगावे लागणारे हलाखीचे पशुतुल्य जीवन ज्या समाजाने त्यांना बहाल केले आहे. त्या समाजाचे आपणही एक घटक आहोत. माणूस म्हणून त्यांचा

विचार न करणे आपल्याला शोभणारे नाही ही अपराधीपणाची भावना "माणसं" मधील प्रत्येक लेखातून अभिव्यक्त होते· मुखपृष्ठ, शीर्षक, रेखाचित्र, अर्पण पत्रिका, प्रस्तावना यातून लेखकाच्या माणसांविषयीच्या जाणिवेच्या सूचना मिळतात· आपण स्वतःला माणूस म्हणवत असू तर या दुष्टचक्रात सापडलेल्या मानवसमूहाला आपण समजावून घेतले पाहिजे· त्यांच्या प्रश्नांना अग्रक्रम देऊन ते सोडवले पाहिजेत· हे भान निर्माण करण्यासाठी अनिल अवचट वाचकांसमोर समाजजीवनाचा आरसा उभा करून, समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता या जीवनमूल्यांचाच अभाव असल्यामुळे माणूसपण कोमेजून टाकणारी व्यवस्था अधिक प्रबळ होत आहे· या वास्तवाचे चिंतनाभिमुख दर्शन घडविणारे अवचट या सामान्य माणसांचे जीवनाविषयीचे प्रचंड अज्ञान, अंधश्रध्दा, रीतीरिवाज, त्यांना कसे अधिकच हलाखीच्या परिस्थितीत रुतवतात याचे वर्णन करतात· दबलेल्या माणसांचे प्रत्ययकारी दर्शन घडविणारे हे लेखन शहरात येणा-या खेडयाची, राजकीय, आर्थिक, सामाजिक अशी कारणमीमांसा करून समाजामध्ये निर्माण झालेल्या विसंगतीचे दर्शन घडवते· या ठिकाणी सोसणारा असाहय माणूस मुकाटपणे वाटयाला जे आलेले आहे ते तो भोगतो आहे· अन्याय करणारा, स्वार्थी, ओरबडणारा, पशुतुल्य वर्तन करणारा असा असल्याचे एकसंध चित्र, कार्यकर्ते पिंडाचे अनिल अवचट आपल्या खास चित्रमय अशा गतिमान शैलीत विविध संदर्भासह "माणसं"मध्ये रेखाटतात· अनिल अवचटांची ही चिंतनपर वैचारिकता "मराठी ललित गद्य" लेखनाची वाट अधिक रेखीव करताना दिसते·

चौथ्या प्रकरणात अनिल अवचट यांच्या "धागे आडवे उभे" मधील आशय व अभिव्यक्तींची वैशिष्टये आपण पाहिली· "धागे आडवे उभे"मधील अनिल अवचट यांचे ललित लेखन हे "वेश्या स्त्री", "तमासगीर स्त्री", "देवदासी स्त्री", "सिनेमा थिएटर कामगार", "हळद कामगार", "यंत्रमाग कामगार" या सतत अत्याचारग्रस्त जीवन जगणा-या मानवसमूहांच्या आयुष्याच्या काटेरी वस्त्राचे आडवे उभे धागे वाचकांसमोर उलगडणारे आहे· प्रचलित समाजव्यवस्थेमध्ये या मानवसमूहांच्या निर्मितिक्षमतेचा जगण्याच्या उर्मीचा नाश होऊन परिस्थितीच्या दडपणाखाली चिरडून होणारे माणूसपणाचे खून आपण पाहू शकतो किंवा पाहायचे नाकारू शकतो, पण हे फार काळ असे चालणारे नाही, माणूस म्हणूनही शोभणारे नाही· अवचटांचा विश्वास माणसांच्या अंतःकरणातील माणूसपणावर आहे· ते माणूसपण जागे करूनच ही परिस्थिती बदलली पाहिजे असा त्यांचा निर्धार आहे· या निर्धारात त्यांना शक्य तितक्या माणसांना सहभागी करून घ्यावयाचे आहे· आपल्या बरोबरीने जगत असलेल्या रक्तामासांच्या माणसांना कसे जगावे लागते,

कोणकोणत्या प्रकारचे भोग त्यांच्या वाटयाला येत असतात याची जाणीव त्यांना समाजमनाला करून द्यावयाची आहे. जी दुःखे मनुष्य निर्मित आहेत, त्यांचा निरासही तो करू शकतो. या वाक्यातील विश्वासामुळे ही दुःखे निर्माण करणारी प्रचलित समाजयंत्रणा बदलण्याचे आव्हान आजच्या सुशिक्षित, सुजाण तरूणांनी स्वीकारले पाहिजे हा आग्रह धरणा-या अवचटांच्या लेखनातील जाणिवांच्या सूचना "धागे आडवे उभे" च्या मुखपृष्ठ, शीर्षक, रेखाचित्र, अर्पण पत्रिका, प्रस्तावना यामधून वाचकाला मिळतात. सर्वथरांमधल्या सुजाण, सुशिक्षित तरूणांपुढे ते समाजजीवनाचा आरसा धरून या समाजजीवनातील स्वातंत्र्य, समता, बंधुता या जीवनमूल्यांचा अभाव कसा माणूसपण कोमेजून टाकतो आहे यासंबंधीचे वास्तववादी चिंतनाभिमुख विचार मांडताना अज्ञान, अंधश्रध्दा, रीतीरिवाज हे सामान्य माणसांच्या जगण्याला कसे अधिक हलाखीचे बनवतात किंबहुना प्रचलित विषम समाजव्यवस्था घट्ट करण्याला हातभार लावतात याचे आशयपूर्ण दर्शन अनिल अवचटांच्या ललित लेखनाने केले आहे. सतत अत्याचारग्रस्त जीवन जगणारे हे मानवसमूह म्हणजे समाजातील दबलेल्या माणसांचे प्रत्ययकारी दर्शन आहे. ही माणसे जगण्याच्या धडपडीत त्यांच्या ग्रामीण जीवनासह शहरात येत आहेत नि एक विसंगतिपूर्ण असे समाजजीवनाचे चित्र अवचटांच्यातील चित्रकार मोठया ताकदीने समाजमनाच्या विशाल कॅनव्हासवर रेखाटतो. त्यामध्ये परदुःख पाहून गहिवरणारे कार्यकर्ता अवचटांचे मन आहे. या सामान्य माणसांच्या जगण्याला मर्यादा पाडणारे विविध संदर्भ निर्भयपणे ते समाजासमोर मांडतात. हे सारे मांडत असताना त्यांची लेखनशैली सोपी, सरळ, प्रवाही पण परखड अशीच आहे. सामाजिक अंगाने वस्तुनिष्ठ लेखन करणा-या अनिल अवचटांच्या "ललित गद्य" लेखनात "मराठी ललित गद्याचा" विकास झालेला दिसतो.

## निष्कर्ष :-

"माणसं" व "धागे आडवे उभे" या अनिल अवचटांच्या लेखसंग्रहांचा अभ्यास केल्यानंतर काही निरीक्षणे नोंदवावीशी वाटतात.

१. "माणसं" व "धागे आडवे उभे" या पुस्तकामध्ये सामान्य माणूस व त्यांचे दुःख केंद्रस्थानी आहे.

२ शोषण करणारा नि शोषित या दोघांचेही चित्र वाचकांसमोर ठेवताना घटना जशा घडल्या तशा ठेवल्या· त्यामधून त्या वाचकांसमोर समाजाचे एकसंध चित्र घेऊन येतात व "कोण माणसं···कोण जनावरं···" हा प्रश्न उभा करतात, हे अवचटांच्या लेखनाचे वैशिष्टय आहे·

३ शोषितांचे वर्णन ते सविस्तरपणे त्यांचा पोशाख, शरीरयष्टी, एखादी लकब, एखादा शब्दप्रयोग अशा बारीकसारीक तपशीलासह रेखाटतात तर शोषकाचे वर्णन थोडक्या शब्दात करतात· शोषकांचा जीवन उत्सव हा शोषितांचे रक्त, दुःख, अश्रू आणि घाम यांनी साजरा होतो आहे, याचे भान ते या उच्च-मध्यमवर्गीयांना सतत देतात·

४ समाजातील विषमतेमुळे लेखक अस्वस्थ होतो· मनातील प्रतिक्रिया तटस्थपणे नोंदवतो, तेव्हा त्याचे ते अस्वस्थपण, त्या प्रतिक्रिया या लेखनाच्याद्वारा वाचकांच्या मनाशी संवाद साधतात·

५ समाजातील सनातन प्रश्नांची चर्चा करणा-या अवचटांची मूळ विचाराची बैठक स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांवर आधारलेली आहे· या मूल्यांना छेद देणारे कुठलेही दृश्य विचार त्यांना अस्वस्थ करतात·

६ आज माणसांच्या मनाची झोपडपट्टी होते आहे, त्यामुळे ते दुःखी आहेत·

७ अवचटांचे मन सजग कार्यकर्त्याचे असल्यामुळे त्यांच्या लेखनात टीकेपेक्षा आत्मीयताच आहे· लेखनाची भूमिका समन्वयवादाची आहे· माणूस म्हणून माणसाला विचार करावयाला लावणारी आहे. सामाजिक प्रक्षोभाचा आविष्कार करावयाला लावणारी नाही·

८ "ललित गद्य" लेखनात अवचटांनी डोळ्यांनी जे जे पाहिले ते ते जीवननिष्ठेने, वस्तुनिष्ठपणे, निर्भयतेने समाजासमोर मांडले·

९ राष्ट्रपिता महात्मा गांधींची पन्नास वर्षांपूर्वीची "खेडयाकडे चला" ही घोषणा आणि १९६० साली "कल्याणकारी राज्य" निर्मिण्याची महाराष्ट्र

शासनाची घोषणा, यांचा एक हिशेब मांडणारी "माणसं" व "धागे आडवे उभे" ही दोन्ही पुस्तके आहेत असे म्हणावेसे वाटते.

१० अनिल अवचटांच्या ललित गद्य लेखनाचा हेतू -

अ. समाजामध्ये वैचारिक क्रांती घडावी.

ब. ऐहिक सुखे, भोगलालसा यासाठी स्वार्थी चढाओढीचा सापशिडयांचा खेळ माणसाने नाकारावा.

क. जीवनाची जी काही प्रगती करावयाची ती "माणूस" म्हणून सगळ्यांसह हे तत्त्व सर्वांनी स्वीकारले पाहिजे.

ड. म्हणजे एक चांगले, अभिमान वाटेल असे, जीवन निर्माण करता येईल.

इ. यासाठी समाजमन जागे असावे लागते, त्यासाठी अशा लेखनाची सातत्याने गरज आहे, समाजपरिवर्तनाच्या या जाणिवेनेच हे लेखन केलेले आहे.

११ "रिपोर्ताज" ही आपल्या लेखनाची प्रकृती न सोडता अवचटांचे हे गद्य "ललित गद्य" होते. आपल्या लेखन पध्दतीचे निश्चित स्वरूप नि अंगभूत सौंदर्य माहीत असलेला हा लेखक आहे.

१२ अवचटांच्या "ललित गद्य"चा "वैचारिकता" हा स्थायीभाव आहे. वैचारिक "ललित गद्य" गतिमान वास्तवाला भिडू शकते. त्यावर भाष्य करू शकते हे या "माणसं" व "धागे आडवे उभे" मधून स्पष्ट होते.

१३ शृंगार रसापेक्षा करूण रस श्रेष्ठ असू शकतो. कारण तो चिंतनाला स्पर्श करणारा असतो याची प्रचिती या दोन्ही लेखसंग्रहातून येते.

१४ अनिल अवचटांचा अनुभव घेण्याचा प्रामाणिकपणा, त्यांच्या लेखनाला एक अंगभूत व्यापकता निर्माण करतो. माणसांची नाना रूपे, त्यांच्या अंतरंगात शिरून न्याहाळणे, त्यांच्या जीवनाचा शोध घेणे हा त्यांच्या कलावंत मनाचा छंद आहे. मानवी जीवनातील रंग, रेषा, रूप, आकार, विकार निसर्ग-

जीवनातील प्राणी, पक्षी, जमीन, आकाश, काष्ठ, शिल्प यामधील सुखदु:खे, विविध छटा व ताल, लय, याचे त्यांना आकलन आहे. त्यामुळेच कलावंताचा अस्सलपणा "माणसं" व "धागे आडवे उभे" या कलाकृतीत आढळतो.

१५ आशय व अभिव्यक्तीची वैशिष्टये ही व्यापक समाजपरिवर्तनाचे साधन म्हणून प्रगटली आहेत. त्यामुळे आशयाशी संपूर्ण एकरूप नि अभिव्यक्तीशी खूप प्रामाणिक असे हे "ललित गद्य" लेखन आहे.

१६ अल्पाक्षर शैली, चित्रमय कथन, सरळ प्रवाही, गतिमान निवेदन अशा या ललित लेखनांचा 'निरीक्षणाचा विस्तृतपणा' हा एक महत्त्वाचा गुण आहे.

१७ "माणसं" हे "ललित गद्य" वाचकाला खिळवून ठेवणारे आहे. त्यामध्ये टवटवीतपणा आहे. सहज व मोकळेपणाबरोबर परखडआत्मपरीक्षण आहे. मनावर प्रभाव पाडणारा रेखीव असा "आकृतिबंध" आहे. "धागे आडवे उभे" मध्ये मात्र लालित्याच्या अंगाने आकृतिबंधात थोडी शिथिलता वाटते. तरीही "धागे आडवे उभे" मधील जीवनाशयाची ताकद मोठी आहे. त्यातील वर्तमान सामाजिक वास्तवामुळे ते वाचकाला जवळचे वाटते हे निश्चित.

१८ अवचटांचे "ललित गद्य" लेखन वाचकांनी विविध दृष्टीकोणातून (साहित्यशास्त्रीय, समाजशास्त्रीय, अर्थशास्त्रीय इत्यादी) विविध पातळीवरून (ललित व वैचारिक) विविध स्थळ काळामधून कसेही फिरवून पाहिले तरी ते सतत अत्याचारग्रस्त सामान्य माणसाचे, माणसांच्या समूहांचे दु:ख, अगतिकता, लाचारी, सामाजिक अन्याय, परिस्थितीच्या दडपणाखाली चिरडले जाणारे माणूसपण यांचेच दर्शन घडविणारे "कॅलिडोस्कोप" आहे.

१९ अनिल अवचट यांच्या "माणसं" व "धागे आडवे उभे" या संग्रहांच्या आधारे तपासलेले) हे "ललित गद्य" लेखन मराठी ललित गद्याच्या विकासाची वाट अधिक विकासोन्मुख, अधिक रेखीव, अधिक समर्थ बनवत आहे असे म्हणावेसे वाटते.